# महाराष्ट्रात महायुतीची चोरलेली सत्ता !





## मविआ सत्तेत येताच शेतकऱ्यांना 3 लाखांपर्यंची कर्जमाफी

## महिलांच्या खात्यात प्रति महिना 3 हजार रुपये

## महासभेत राहूल गांधींचे आश्वासन व विरोधकांवर शरसंधान

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.16 )-** महाराष्ट्रात महाविकास आघाडी सत्तेत आल्यावर डिसेंबर महिन्यात तुमच्या खात्यात 3 हजार रुपये आलेले असेल, तुम्ही ते काढायला तालुक्यात जाल तेव्हा एसटी प्रवास मोफत झालेला असेल, इतकेच नव्हे शेतकऱ्यांनाही तीन लाखापर्यंतची कर्ज माफी दिली जाईल. असे आश्वासन देत, महाराष्ट्रात असलेली ही महायुतीची सत्ता महाविकास आघाडीकडून चोरलेली असल्याचे सांगत विरोधकांवर लोकसभेचे विरोधी पक्ष नेता खा.राहूल गांधी शरसंधान केले.

धामणगाव विधानसभा क्षेत्राचे महविकास आघाडीचे आणि काँग्रेस चे उमेदवार प्रा. वीरेंद्र जगताप आणि जिल्ह्यातील इतर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जुना धामणगाव येथे राहुल गांधी यांची प्रचारसभेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी मंचावर छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल, काँग्रेस चे संघटन प्रमुख के सी वेणूगोपाल, मध्यप्रदेश काँग्रेस अध्यक्ष जीतू पटवारी, काँग्रेस पक्षाच्या लोकसभा निरीक्षक यासह महाविकास आघाडीचे उमेदवार, प्रा. वीरेंद्र जगताप, बबलू देशमुख, ?ड.यशोमती ठाकूर, खासदार बळवंत वानखडे यांच्यासह इतर पदाधिकारी व उमेदवार उपस्थित होते.

राहुल गांधी पुढे म्हणाले की, ही फक्त विधानसभेची लढाई नाही, तर ही संविधान वाचविण्यासाठीची लढाई आहे, महाराष्ट्रात चोरीचे सरकार आतापर्यंत होते. अदाणी, अंबानी यासारख्या व्यापाऱ्यांच्या घश्यात कोट्यवधी रुपयांच्या जमिनी घालता याव्या याकरिता भाजपाने महाराष्ट्रातील पक्ष चोरी करून सरकार बनविले. प्रत्येकी 40 ते 50 कोटीं रुपयामध्ये आमदारांचा व्यवहार झाला, कुणी दिले हे पैसे सर्व देशाला माहीत आहे. राहुल गांधीलाच संविधानाच्या विरोधात सांगतात, प्रधानमंत्री मोदी यांची मेमोरी लॉस झाली आहे, आमचे भाषणं ते चोरुन जनतेपुढे मांडतात. अशी घणाघाती टीकाही राहुल गांधी यांनी यावेळी केली. भाजप युतीचे सरकार आपल्या टॅक्स चा पैसा उद्योगपतींना देतात, तर महाविकास आघाडीचे सरकार तोच पैसा गोरगरिबांना देईल असेही राहुल गांधी यांनी सांगितले.

### संविधान वाचविण्यासाठीची ही लढाई

हे संविधान छत्रपती शिवाजी महाराज, बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, यांच्यासारख्या अनेक विचारवंतांच्या विचारातून बनलेले आहे, संविधानात पक्ष चोरीचे कुठेही सांगितले नाही. आज अनेक मोठ्या कंपनीत कार्यरत अधिकारी पहा सर्व विशिष्ट जातीचे दिसणार दलित, आदिवासी, ओबीसी हे मोठ्या हुद्द्यावर दिसणारच नाही. म्हणून जातीय जनगणना आमचे सरकार करणार आहे.

### सोयाबीन ला 7 हजार भाव देणार

महविकास आघाडीचे सरकार शेतकऱ्यांच्या कर्जमाफी सोबतच काँग्रेस च्या सरकार मध्ये सोयाबीनला 7 हजार भाव देणार, कांद्याच्या भावासाठी कमिटी स्थापन करून होणाऱ्या चढ उताराचा फटका शेतकऱ्यांना बसणार नाही, याची काळजी आमचे सरकार घेणार, यासह विविध आजारांच्या उपचारासाठी 25 लाखांचा आरोग्य विमा आमचे सरकार देणार असल्याचे आश्वासन गांधी यांनी दिले.

### सभेला हजारोंची उपस्थिती

दुपारी बरोबर 12 वाजून 15 मिनिटांनी राहुल गांधी सभास्थळी पोहचले तर 50 मिनिटे त्यांचे भाषण झाले, राहुल गांधी यांना पाहताच लोकांमध्ये उत्साह संचारला होता, सभेला मतदारसंघातून 40 हजारांवर नागरिकांनी गर्दी केली असल्याचे दिसून येत होते.

# राहुल गांधी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी

## खोके घेऊन जाणाऱ्यांची तपासणी करा-यशोमती ठाकुर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 ) -** राज्यात सध्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. निवडणुकीमुळं राज्यातील राजकारण चांगलंच तापलंय. तर दुसरीकडं निवडणुकीच्या प्रचारासाठी राज्यातील सर्वच नेते, विविध पक्षांचे प्रमुख स्टार प्रचारक राज्यभर फिरत आहेत. एका मतदारसंघातून दुसऱ्या मतदारसंघात त्वरित पोहोचण्यासाठी हे नेते हेलिकॉप्टरचा वापर करत आहेत. दरम्यान, या निवडणुकीच्या काळात पैशांसह कुठल्याही वस्तूंची ने-आण केली जाऊ शकते. त्यामुळं निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी बॅग तपासणी सुरू केली.



काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी जाहीर सभेसाठी अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथे हेलिकॉप्टरने आले होते. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या वतीनं तैनात अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी केली. राहुल गांधी यांच्या हेलिकॉप्टर तपासणी संदर्भात यशोमती ठाकूर यांनी आक्षेप घेतला. निवडणूक आयोग हे खरंतर निष्पक्ष असावं. ज्याप्रमाणं उद्धव ठाकरे आणि राहुल गांधी यांच्या बॅगची तपासणी केली जात आहे, त्याप्रमाणेच मोदी आणि शाहांच्या बॅगची तपासणी देखील व्हायला हवी. राज्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या बॅगा देखील तपासल्या जाव्यात, असं यशोमती ठाकूर म्हणाल्या. खरंतर खोके घेऊन ते गेले होते, आम्ही आहे तिथेच आहोत. त्यामुळं खोके घेऊन जाणाऱ्यांच्या हेलिकॉप्टरची तपासणी व्हायला हवी.

निवडणूक आयोग दुजाभाव करत आहे. लोकसभेतही निवडणूक आयोगानं दबाव तंत्राचा वापर केला आणि आता देखील विधानसभा निवडणुकीत अतिशय दुजाभाव करत आहे. लोकशाहीत एका पक्षाला एक न्याय आणि सत्तेत असणाऱ्यांना दुसरा न्याय असं चालत नाही. बोलायचं तर बरच काही आहे पण बोलणार नाही. मात्र, राज्यात महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून येणार, असा विश्वास यशोमती ठाकूर यांनी व्यक्त करत महायुतीला टोला मारला.

# फवारणी करताना शेतकऱ्याचा मृत्यू

**बडनेरा परिसरातील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 ) -** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरखेडा ते कवठा रस्त्यावरील शेतात तूर पिकावर फवारणी करणाऱ्या शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना 11 नोव्हेंबर रोजी सकाळी घडली. अशोक वसंतराव इंगळे (55, रा. गौरखेडा, भातकुली, जि.अमरावती) असे मृताचे नाव आहे. 11 नोव्हेंबर रोजी अशोक इंगळे हे तूर फवारणीसाठी गौरखेडा ते कवठा रस्त्यावर जयंत सगणे यांच्या शेतात गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही तो घरी न पोहोचल्याने त्यांचा पुतण्या अमर ज्ञानेश्वर इंगळे (28) याने शेतात जाऊन अशोकला शेतात पडलेले पाहिले. त्याला इतर शेतकऱ्यांच्या मदतीने तातडीने जिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. जिथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अमर ज्ञानेश्वर इंगळे यांच्या फिर्यादीवरून बडनेरा पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# बिबट्याने केली गायीची शिकार

## मार्डामध्ये दहशत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 ) -** तिवसा तालुक्यातील मौजा मार्डा गट क्रमांक 35 मध्ये ग्रामसेवक महादेव शामराव भुसाटे यांच्या शेतातील गोठ्यातून शनिवारी पहाटे 3 वाजता बिबट्याने गायीची शिकार केली.



गेल्या तीन-चार वर्षांपासून हा बिबट्या या परिसरात वावरत असून यापूर्वीही तीन कुत्र्यांची शिकार झाल्याचे या भागातील शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. आता गायीची शिकार झाली. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या फार्म शेडमध्ये अनेक शेतकऱ्यांची जनावरे बांधलेली आहेत. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. या घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली. त्याचवेळी वनविभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला. तसेच शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याचे आश्वासन दिले.



## आज पंकजा मुंडे यांची सभा

**धामणगाव रेल्वे-** भाजपा महायुतीचे उमेदवार प्रताप अडसड यांच्या प्रचारार्थ राज्याच्या माजी महिला व बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांची नांदगाव खंडेश्वर येथे सकाळी दहा वाजता प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन नांदगाव खंडेश्वर चे तालुकाध्यक्ष अनिकेत ठाकरे यांनी केले आहे.

# यशोमती ठाकूरांचा तिवसा मतदारसंघात झंझावाती प्रचार

## मतदारांचा प्रतिसाद पाहून विरोधक धास्तावले

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.16 )-** तिवसा विधानसभा मतदार संघासाठी महाविकास आघाडीच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत असलेल्या यशोमती ठाकूर यांनी मतदारसंघातील प्रत्येक गावात झंझावाती प्रचार दौरा करून नागरिकांशी थेट संवाद साधला. गावोगावी नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याने यशोमती ठाकूर यांच्या विरोधकांनी धास्ती घेतली असून त्यांचे धाबे दणाणले आहे.



विधानसभा निवडणूक 20 नोव्हेंबर रोजी होत असल्यामुळे सर्व उमेदवारांनी आपल्या प्रचाराचा धडाका सुरू ठेवला आहे. यशोमती ठाकूर ह्या महाविकास आघाडी तर्फे तिवसा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहेत. मतदारसंघातील प्रत्येक गावात त्यांनी विविध योजना राबवत विकास केला. आपल्या मतदारसंघाचा कायापालट करण्यासाठी त्या नेहमीच सज्ज राहणार आहे. त्यामुळे त्यांनी मतदारांना देखील आश्वासन देऊन येणाऱ्या काळात आणखीन या मतदार संघाचा चेहरा-मोहरा बदलवू असा शब्द दिला आहे. यशोमती ठाकूर यांच्यासारखा तडफदार नेता लाभल्यामुळे मतदार संघातील जनता देखील खुश आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत त्या मोठ्या मताधिक्याने निवडून येतील असा विश्वास प्रत्येक गावातील नागरिकांनी व्यक्त केला आहे. यशोमती ठाकूर यांच्या प्रचार दौऱ्यात प्रत्येक गावातील महिला व पुरुषांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभत असल्याने जनतेचा कौल त्यांनाच आहे असे चित्र स्पष्ट झाले. पदयात्रेचे प्रत्येक गावात नागरिकाकडून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. महिलांनी देखील यशोमती ठाकूर यांना ओवाळून त्यांचे जंगी स्वागत केले. पुष्पवृष्टी करून यशोमती ठाकूर यांच्या प्रति आदरभाव व्यक्त होत असल्याने त्यांच्यावर जनता मोठ्या संख्येने प्रेम करत असल्याचे दिसून येते. महाविकास आघाडीच्या उमेदवार यशोमती ठाकूर यांच्या प्रचारार्थ आज 15 नोव्हेंबर रोजी ईसापुर, जुनी भारवाडी, नवीन भारवाडी, ठाणाठुनी, चांदूर ढोरे ,वरखेड, कुऱ्हा, दिवानखेड, माऊली जहागीर, वाघोली, डिगरगव्हाण या गावात आज प्रचार दौरा काढण्यात आला. साधला. दरम्यान वरखेड येथील श्री संत आडकूजी महाराज पुण्यतिथी महोत्सवात यशोमती ताई यांनी उपस्थिती लावून दर्शन घेतले. तसेच पालखी रिंगण सोहळ्यात हजेरी लावून त्यांनी कुऱ्हा येथील कार्यक्रमात देखील सहभाग घेतला.

# बच्चू कडूंचा प्रिती बंड यांना बिनशर्त पाठिंबा

## आज बडनेरा येथे 'ऑटो' च्या समर्थनार्थ बच्चू कडूंची सभा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.16 )-** अचलपूरचे आमदार आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे उमेदवार बच्चू कडू यांनी बडनेरा विधानसभा मतदारसंघात आमदार रवी राणा यांच्या विरुद्ध असलेल्या शिवसेना (उबाठा) बंडखोर अपक्ष उमेदवार प्रीती बंड यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. बच्चू कडू रविवारी (17 नोव्हेंबर) सायंकाळी बडनेरा येथं प्रीती बंड यांच्या समर्थनात जाहीर सभा देखील घेणार आहेत.

प्रहार पक्षाच्यावतीनं अमरावती महानगर प्रमुख बंटी रामटेके आणि प्रीती बंड यांच्यावतीनं बडनेरा मतदारसंघातील माजी आमदार ज्ञानेश्वर धाने यांनी पत्रकार परिषद घेऊन बच्चू कडू यांनी प्रीती बंडे यांना बिनशर्त पाठिंबा जाहीर केल्याची घोषणा केली.



बच्चू कडू हे जुने शिवसैनिक आहेत. शिवसेनेचे दिवंगत नेते माजी आमदार संजय बंड आणि मी आमदार असताना बच्चू कडू शिवसेनेत होते. बच्चू कडूंचे संजय बंड यांच्याशी घनिष्ठ संबंध होते. जुने शिवसैनिक असणारे बच्चू कडू यांनी कुठलीही अपेक्षा न बाळगता प्रीती बंड यांना पाठिंबा जाहीर केला, अशी माहिती ज्ञानेश्वर धाने यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.



जनतेच्या उमेदवार झालेल्या प्रीती बंड यांना आता सर्व बाजूंनी पाठिंबा मिळत आहे. प्रत्येक जातीचे, धर्माचे, पंथाचे लोक त्यांच्यासोबत दिसू लागले आहेत. यासोबतच आता विविध पक्ष आणि छोटे गटही त्यांना पाठिंबा देऊ लागले आहेत. प्रहार जनशक्ती पक्षानेही त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. प्रहारचे संस्थापक बच्चू कडू उद्या रात्री बडनेरा येथील नायबस्ती येथे प्रीती बंड यांच्या समर्थनार्थ भव्य जाहीर सभा घेणार आहेत. प्रीती बंड कोणत्याही पक्षात सामील होत नसल्याचे उल्लेखनीय आहे. अनेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते त्यांना छुप्या पद्धतीने पाठिंबा देत असल्याचेही वातावरण दिसून येते. काल बच्चू कडू यांच्या पत्नी नयना कडू यांचीही भातकुली परिसरातील काही गावांमध्ये बैठक घेतली. ज्यामध्ये त्यांना जनतेचा मोठा पाठिंबा मिळाला. प्रीती बंड यांना मुस्लिम लीग, मराठा महासंघ आणि बारी समाजाचाही पाठिंबा मिळू शकतो, अशीही माहिती आहे. मात्र, अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. बच्चू कडू हे राज्यातील तिसऱ्या आघाडीचे घटक असून त्यांनी या निवडणुकीत भाजपपासून पूर्ण अंतर राखले आहे. प्रीती बंड यांच्या पाठीशी तिसरी आघाडी उभी राहिली असती तर त्यांची ताकद वाढली असती. जनसामान्यही प्रीती बंडसाठी मते आणि पैसा दोन्ही देत आहेत. प्रीती बंडच्या प्रचारासाठी लोक त्यांच्या इच्छेनुसार एक रुपयांपासून हजार रुपयांपर्यंतची मदत स्वेच्छेने देत आहेत.

### शिवसैनिकही प्रीती बंड यांच्या पाठीशी ?

प्रीती बंड यांच्या प्रचारासाठी बच्चू कडू हे रविवारी सायंकाळी सहा वाजता बडनेरा नवी वस्ती येथील आठवडी बाजार चौक येथं जाहीर सभा घेणार आहेत. बडनेरा विधानसभा मतदारसंघात सर्वसामान्य जनता स्वत:च्या खिशातील पैसे जमा करून प्रीती बंड यांच्या पाठीशी उभी झाली. शिवसैनिक देखील प्रीती बंड यांनाच साथ देणार, असं ज्ञानेश्वर धाने म्हणाले.

# कमळ म्हणजेच पाना...

- **नवनीत राणांच्या वक्तव्याचा रवी राणांना फटका**
- **उरलेसुरले मुस्लिम व दलित मते प्रिती बंड यांच्या पारड्यात**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती ( दि.16 )-** बडनेरा मतदारसंघातील प्रचारात प्रिती बंड यांनी मुसंडी मारत प्रस्थापितांची झोप उडविली आहे. रवी राणा यांनी मुस्लिम व दलित मते आपल्याकडे बांधून ठेवण्याकरिता भाजपमध्ये प्रवेश न करता फक्त महायुतीचे समर्थन घेतले. मात्र भाजपच्या स्टार प्रचारक आणि रवी राणा यांच्या पत्नी नवनीत राणा यांनी दर्यापूर मतदारसंघात रमेश बुंदिले यांच्या प्रचारादरम्यान कमळच पाना आहे, असा संदेश देत मतदारांना आवाहन केल्याने याचा परिणाम थेट बडनेरा मतदारसंघात पहायला मिळत आहे. हिंदुत्ववादी भाजप ला मतदान न करणारे उरलेसुरले मुस्लिम व दलित मतदार आता रवी राणा यांच्या 'पाना' पासून दूर जाताना दिसत आहे. हे मतदार थेट आता प्रिती बंड यांच्या 'ऑटो'ला आपली पसंती दाखवित आहे.



दर्यापूर मतदारसंघात महायुतीच्या विरोधात उघड प्रचार सुरू केल्याने वातावरण तापले आहे. महायुतीतील शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचे उमेदवार अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात असलेले युवा स्वाभिमान पक्षाचे रमेश बुंदिले यांच्यासाठी गेल्या तीन दिवसांपासून नवनीत राणा या पदयात्रा, सभा घेत आहेत. रमेश बुंदिले यांचे निवडणूक चिन्ह पाना आहे. कमळच पाना आहे, असा संदेश त्या मतदारांना देत आहेत. परंतू या संदेशाचा थेट परिणाम रवी राणा यांच्या बडनेरा मतदारसंघात पडला आहे. त्यामूळे 'शेकचिल्ली' च्या कहानीप्रमाणे या राणादाम्पत्याची गत झाली आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मोर्शी मतदारसंघात तिरंगी लढत

## उमेश यावलकर, देवेंद्र भुयार आणि विक्रम ठाकरे लावताहेत ताकद

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.16 )** – होऊ घातलेल्या महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीमध्ये मोर्शी मतदार संघात महायुती च्या दोन उमेदवारांना आप आपल्या पक्षाने तिकीट दिल्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. महायुतीच्या राष्ट्रवादी अजित पवार गटाने बारामती नंतर मोर्शी मतदार संघात सर्वाधिक कामे मंजूर करून आणणारे विद्यमान आमदार देवेंद्र भुयार, आपला उमेदवार असल्याचे अनेक दिवसापासून सांगून टाकले होते. तसेच वेळेवर जिल्हा भाजपचे अध्यक्ष खासदार अनिल बोंडे यांनी सुद्धा जाहीर करून टाकले होते की, आपण राष्ट्रवादीच्या उमेदवार देवेंद्र भुयार यांच्यासाठी प्रचार करणार नाही. त्यामुळे त्यांनी खूप परिश्रम करून भाजपचे तिकीट वरुडच्या उमेश यावलकर यांना मिळवून दिली आणि मैत्री पूर्ण लढतीच्या नावावर भूयारांपुढे आव्हान उभे केले.





तसे पाहता 1962 पासून हा मतदारसंघ 2004 पर्यंत काँग्रेसचा बालेकिल्ला असल्याचे दिसून येते. झालेल्या 13 विधानसभा निवडणुकांमध्ये 7 वेळा काँग्रेसचा उमेदवार विजयी झाला आहे. तर 3 वेळा अपक्ष उमेदवाराने बाजी मारली आहे. तीनही वेळा हे अपक्ष उमेदवार सत्तेत जाऊन बसले. यामध्ये अनिल बोंडे, हर्षवर्धन देशमुख यांचा समावेश आहे. एकेकाळी या मतदारसंघात गेम चेंजर म्हणून हर्षवर्धन देशमुख यांच्याकडे पाहिले जात होते. हळूहळू हर्षवर्धन देशमुख यांचा प्रभाव कमी झाला. त्यांचे विरोधक वाढायला लागले. पुरुषोत्तम मानकर, नरेशचंद्र ठाकरे, अनिल बोंडे हे सर्व हर्षवर्धन देशमुख यांच्याशी टक्कर घेऊन निवडून आले होते. परंतु सध्या खासदार अनिल बोंडे यांच्याकडे या मतदारसंघाचे किंग मेकर म्हणून पाहिले जाते. खासदार बोंडे यांना फक्त देवेंद्र भुयार नको आहेत, कारण त्यांनी सन 2019 च्या निवडणुकीत नाट्यमय घडामोडींमूळे बोंडे यांना पराभूत झाले होते. सध्या लढतीत असलेल्या प्रमुख चार लोकांमध्ये भाजपचे उमेश यावलकर, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे देवेंद्र भुयार, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गिरीश कराळे तर काँग्रेसचे तिकीट न मिळाल्यामुळे अपक्ष विक्रम ठाकरे यांचा समावेश आहे. सुरू असलेल्या प्रचारात गिरीश कराळे हे थोडे मागे पडले असल्याचे दिसून येत आहे.

तर प्रचारात आघाडी घेणारे उर्वरित तिघे उमेदवार एकमेकाशी लढत देत आहे. या मतदारसंघात अपक्षांचा इतिहास पाहता आणि अनिल बोंडे यांना फक्त देवेंद्र भुयार नको आहेत आणि रिंगणातील उमेदवार विक्रम ठाकरे अपक्ष असूनही समर्थपणे लढत देत असल्याने आश्चर्य व्यक्त केला जात आहे. वरुड च्या काँग्रेस तालुका अध्यक्ष यांनी अपक्ष उमेदवारास पाठिंबा दिला असल्याने काही समीकरणे बदलू शकतात. अपक्षाने निवडणुकीतील विजयानंतर महायुतीला पाठिंबा दिल्यास मतदारांचा भ्रमनिरास होऊ शकतो, अशा चर्चांना सुद्धा फुटले आहे. आजवर केवळ जातीच्या भरवशावर राजकारण करणारे आज मात्र जातीपातीच्या भरवशावर राजकारण करू नका अशी आरोळी ठोकत आहे. उलेमा कौन्सिलने महाविकास आघाडीला दिलेल्या 17 मागण्या संदर्भात या भागात जोरदार चर्चा होत आहे. या 17 मागण्यांचा कुणाला फायदा होईल, ही मते निर्णायक असतील का? यावरही तर्क वितर्क लावल्या जात आहे. तरीही 20 तारखेला असलेली शेवटची क्रमवारी 23 तारखेला स्पष्ट होईल.



**अमरावती– काँग्रेस कमिटी चे शहराअध्यक्ष बबलू शेखावत व उपाध्यक्ष अनिकेत देशमुख यांनी बेलोरा विमानतळ येथे काँग्रेस नेते व लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना शिव छत्रपतींची प्रतिमा देऊन त्यांचे स्वागत केले.**

---

## सुधीर उघडे यांना मातृशोक

**मोर्शी** – येथून जवळच असलेल्या अंबाडा येथील श्रीमती प्रभावती महादेवराव उघडे यांचे वृद्धापकाळाने नुकतेच दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय 85 वर्षे होते. त्यांच्या मृत्यू पश्चात 3 मुले नरेश, सुधीर आणि भास्कर, 3 मुली, सुना नातवंड असा मोठा आप्तपरिवार आहे. येथील माजी ग्रामपंचायत सदस्य सुधीर उघडे यांच्या त्या आई होत. यांच्या अंत्ययात्रेला शेकडो लोकांची उपस्थिती होती.



---

## दिव्यांग कर्मचाऱ्यांची निवडणुकीच्या कामातून मुक्तता

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.16 )**– निवडणूक आयोग निर्णय निर्देशानुसार दिव्यांग कर्मचाऱ्यांना निवडणूक कामातून वगळण्यात यावे अशी मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र दिक्षित, जिल्हासचिव किशोर मालोकार, कार्याध्यक्ष चंद्रकांत मामनकर, अफसर खान आणि इतर पदाधिकारी यांनी यापूर्वीच जिल्हाधिकारी यांना निवेदन दिलेले आहे. महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई 32 जिल्हा शाखा अमरावतीच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनाची दखल घेऊन मा.जिल्हाधिकारी सौरभ कटियार साहेब, तसेच उपजिल्हा निवडणूक अधिकारी मा. शिवाजी शिंदे साहेब यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांना दिलेले निवडणूक आदेश रद्द करण्याबाबतचे पत्र जिल्ह्यातील सर्व एसडीओंना दिले आहे. त्यामुळे सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांना दिलासा दिलेला आहे.



**महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे यश**

केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोग यांनी दिव्यांगांना 12 मार्च 1997 च्या पत्राच्या अनुषंगाने निवडणूक काम न देण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत. यावेळी याबाबत महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना मुंबई 32 चे राज्याध्यक्ष रवींद्र पाटील व राज्यसचिव परमेश्वर बाबर यांनी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तसेच सर्व विधानसभा मतदारसंघ अधिकारी यांना दिव्यांगांना निवडणूक काम देऊ नये बाबत केंद्र व राज्य निवडणूक आयोग तसेच महाराष्ट्र शासनाचे सर्व पत्रके तसेच अपंग व्यक्ती हक्क अधिनियम कायदा 2016 मधील तरतुदी प्रत्यक्ष भेटीत निवेदनाद्वारे लक्षात आणून दिले होते. हे विशेष.

---

## अचलपूर मतदार संघात 421 दिव्यांग आणि 85 वर्ष वरील मतदान पूर्ण

### 14 पथकांनी पार पाडली मतदान प्रक्रिया

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.16 )** – अचलपूर मतदार संघात 421 मतदार यांनी गृह मतदान केले आहे. यामध्ये दिव्यांग आणि 85 वर्ष वयावरील मतदारांचा समावेश आहे. तर ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी 14 पथके नेमण्यात आली होती.

निवडणूक आयोगाने एक उत्कृष्ट निर्णय घेऊन यात दिव्यांग आणि 85 वर्ष पूर्ण असलेल्या मतदार यांचे गृहमतदान पासून त्यांना वंचित ठेवले नाही. अचलपूर मतदार संघात विधानसभा निवडणुकीकरिता येत्या 20 नोव्हेंबर ला मतदान होत असताना कोणीही मतदार मतदान पासून वंचित राहू नये, यांची जबाबदारी अचलपूर उपविभागीय अधिकारी यांनी घेतली असल्याचे पाहायला मिळते.निवडणूक आयोगाच्या या निर्णय याचे सर्व स्तरावरून कौतुक होते आहे. चांदूर बाजार आणि अचलपूर तालुका मिळून एकूण दिव्यांग आणि 85 च्या असलेले मतदार हे 421 होते.त्याचे गृह मतदान प्रक्रिया दिनांक 15 नोव्हेंबर ला राबविण्यात आली आणि ती यशस्वी रित्या पूर्ण देखील झाली. अशी माहिती निवडणूक विभाग नायब तहसीलदार अक्षय मांडवे यांनी दिली. तर गृह मतदान साठी पथक हे अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत आरखराव यांच्या नेतृत्वाखाली तयार करण्यात आली होती.



---

## देवेंद्र भुयारांच्या घड्याळीचा प्रचारात वाढता वेग

### प्रतिस्पर्धी तीन उमेदवारांची मात्र दमछाक

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.16 )** – मोर्शी–वरुड विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाल्यानंतर विद्यमान आमदार देवेंद्र भुयार हे प्रचारात थोडे मागे पडले असल्याचे दिसत होते, प्रतिस्पर्धी उमेदवारांनी सुरुवातीला आघाडी घेतली होती. परंतु जशीजशी प्रचाराची घोडदौड सुरू झाली, तशीतशी मतदारांचा प्रतिसाद देवेंद्र भुयारांना विकासावर मिळू लागल्यामुळे त्यांच्या घड्याळीने आता प्रचारात वेग घेतला असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा घड्याळाला या मतदारसंघात मतदारांच्या भरवशावर पुढे जाणार असे चित्र तुर्तास दिसून येत आहे.



मागील 2019 च्या विधानसभेच्या निवडणुकीत देवेंद्र भुयारांना 96 हजार मते मिळाली होती, तर त्यांचे प्रतिस्पर्धी भाजपाचे उमेदवार डॉ.अनिल बोंडे यांना 86 हजार मते मिळून त्यांचा पराभव झाला होता. देवेंद्र भुयार हे केवळ 10 हजार मतांनी विजयी झाले होते. त्यावेळेस त्यांच्यासोबत मतदार संघातील काही बडे नेते होते. त्यामुळेच देवेंद्र भुयारांचा विजय झाला असे बोलल्या जात आहे, परंतु या वेळेस त्यांच्याजवळ ते नेते जरी नसले तरी मात्र मतदार हे त्यांच्याजवळ असल्यामुळे त्यांचा विजय हा जवळपास निश्चित मानला जात आहे. देवेंद्र भुयार यांनी आमदारकीच्या पाच वर्षाच्या काळात मोर्शी, वरुड मतदार संघात मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करून दिली. एवढेच नाही तर मतदार संघातील काही गावात पिण्याच्या पाण्याची योजनाही सुरु करून दिली. सोबतच विविध कामे त्यांनी या काळात केले. ग्रामीण रुग्णालय असो की शासकीय कार्यालय त्यांनी सर्वकाही सुसज्ज केले, आता त्याच विकासाच्या मुद्द्यावर त्यांचा या निवडणुकीत प्रचार सुरू आहे. त्यामुळे मतदार त्यांच्या या विकासाला साथ देणार यात तीळमात्र शंका नाही.

या उलट विरोधक उमेदवारांची या निवडणुकीच्या काळात दमछाक होताना दिसून येत आहे. शिस्तबद्ध असा प्रचार रॅली सभा देवेंद्र भुयार यांचा मतदार संघात सुरू असल्यामुळे विरोधकांच्या पायाखालील वाळू सरकलेली आहे. याचा फायदा पुन्हा एकदा देवेंद्र भुयारांना होणार अशी चर्चा मतदार संघात जोर धरू लागली आहे.

---

## अचलपुर विधानसभेत वोटर स्लिपचे वितरण

### तक्रार असल्यास बि.एल. ओ. अथवा नायब तहसिलदारांशी संपर्क साधण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार ,( दि.16 )**–आगामी 20 नोंव्हेबर रोजी होणा–या विधानसभा निवडणूकीकरिता अचलपूर विधानसभा क्षेत्रातील सर्व गावात मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (बि.एल.ओ) मार्फत वोटर स्लिपचे वितरण करण्यात आले आहे. मतदारांना जर वोटर स्लीप मिळाली नसल्यास त्यांनी बि.एल.ओ. यांच्याशी किंवा निवडणूक शाखेतील नायब तहसिलदार यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सदर वोटर स्लिपवर मतदाराचे नाव त्याचा मतदार यादीतील अनु क्रमांक, मतदान केंद्राचे नाव इत्यादी तपशिल नमुद राहणार आहे. या तपशिलाच्या आधारे मतदारांना मतदान करण्यास सुविधा होणार आहे. वोटर स्लिपचे वाटप संबधित बि.एल.ओ. मार्फत करण्यात येत आहे. केवळ वोटर स्लिपच्या सहाय्याने मतदान करता येणार नाही. वोटर स्लिप सोबत



मतदार ओळखपत्र, आधार कार्ड किंवा कोणतेही मान्यतापात्र ओळखपत्र मतदारांनी सोबत ठेवावे. दरम्यान वोटर स्लिपचे वाटप झाले किंवा नाही याबाबतची पडताळणी निवडणूक विभागाकडून होणार असल्याचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांनी सांगितले. तसेच मतदानाच्या दिवशी आठवडी बाजार, कृषी उत्पन्न बाजार समिती बंद राहणार आहे. तेव्हा मतदारांनी अधिकाअधिक संख्येने सकाळी 7 वाजता पासुन सांयकाळी 6 वाजेपर्यंत मोठ्या संख्येने घराबाहेर पडून लोकशाहीच्या उत्साहात सामिल होवून मतदान करावे. असे आवाहनही निवडणूक निर्णय अरखराव यांनी केले आहे.

---

## वंचित बहुजन आघाडीमध्ये शेकडो कार्यकर्त्यांचा प्रवेश

### डॉ.निलेश विश्वकर्मांची वाढती ताकद

**महासागर प्रतिनिधी**

**नांदगाव खंडेश्वर, ( दि.16 )**– वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार डॉ.निलेश विश्वकर्मा यांना निवडून आणण्यासाठी विविध संघटनेच्या कार्यकर्त्यांनी वंचित बहुजन आघाडीत जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी प्रवेशावेळी डॉ.निलेश विश्वकर्मा यांनी कार्यकर्त्यांना पुष्पगुच्छ व पक्षाचा दुपट्टा देऊन त्यांचा सन्मान केला.

धामणगाव मतदार संघातील तेली, माळी, धनगर व इतर समाजातील संघटनेच्या नेत्यांनी नांदगाव खंडेश्वर येथे प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. ओबीसी व आदिवासी पदाधिकाऱ्यांच्या प्रवेशामुळे डॉ.निलेश विश्वकर्मा यांचे पारडे अधिक जड झालेले आहे. ही निवडणूक संघर्षाची आहे. गेल्या 60 वर्षापासून मतदार संघात कुठलाही विकास झालेला नाही. त्यामुळे आलटून–पालटून सत्ता भोगणाऱ्यांना यावेळी जनता हिसका दाखविल्याशिवाय राहणार नाही. शेतकऱ्यांसमोर अनेक प्रश्न निर्माण झालेले आहे. परंतु दोन्ही आजी–माजी आमदारांनी यावर कुठल्याही प्रकारचा तोडगा काढलेला नाही. त्यामुळे जनता दोघांनाही वैतागली आहे. काँग्रेसवाले मुस्लिम मते वळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु बाळासाहेबांनी जाहीर सभेत एनआरसी चा मुद्दा पटवून सांगितला. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी शिवाय दुसरा पर्याय नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले. डॉ.निलेश विश्वकर्मा यांना मिळत असलेला प्रतिसाद पाहता विरोधकांचे चांगले धाबे दणाणले आहे. मात्र यावेळी नागरिकांनी सिलेंडरला निवडून आणण्याचा एक प्रकारे निर्धार केला आहे. त्यामुळे दोन्ही आजी–माजींना जनता धडा शिकवणार आहे.



### यांचा केला पक्षात प्रवेश

वंचित बहुजन आघाडीमध्ये विविध समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर प्रवेश केला आहे. यामध्ये विजय देशमुख (धामणगाव रेल्वे), सचिन विलायतकर (वाठोडा), सुनील पाटणकर (धामणगाव रेल्वे), नितीन गर्भारकर (धामणगाव रेल्वे), अखिल शेख, इनायत शेख, संतोष बिहारे यांचा समावेश आहे. विविध संघटनांनी पाठिंबा दिल्यामुळे डॉ.निलेश विश्वकर्मा यांचे पारडे जड झाले आहे.

---

## भाजपशी ठेवलेले कथीत छुपे संबंध अंगलट?

### अचलपूरात लढतीत काँग्रेस दुसऱ्यावरुन तिसऱ्या क्रमांकावर

**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा, ( दि.16 )**– 'काहीही करु पण बच्चू कडूंना पाडू', असा चंग बांधून असलेले भाजप नेत्या नवनित राणा आणि काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांची कथित छुपी हातमिळवणी वारंवार चर्चेत राहील्याने ऐन मतदानाच्या तोंडावर या छुप्या युतीचा विषय आता काँग्रेसच्या अंगलट येताना दिसत आहे. याप्रकारामूळे प्रचारात काँग्रेस आपोआपच मागे पडल्याने सुरुवातीला कमजोर उमेदवार म्हटल्या जात असलेले भाजप चे प्रविण तायडे यांना याचा फायदा होताना दिसत आहे. बच्चू कडू आणि प्रविण तायडे यांच्यात थेट लढत दिसत आहे. तर काँग्रेस लढतीत दुसऱ्या क्रमांकावरुन तिसऱ्या क्रमांकावर आली आहे.

लोकसभेमध्ये काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख हे नवनित राणा यांना आतून मदत करित असल्याचा आरोप त्यांच्या विरोधकांनी केला होता. तसेच बबलू देशमुख हे लवकरच 'भाजप' वाशी होतील, अश्या वावड्याही उठल्या होत्या. परंतू जेव्हा जेष्ठ विचारवंत श्याम मानव यांनी बबलू देशमुख हे भाजपचे 'स्लिपर सेल' असल्याचे सांगत





त्यांनी आपल्याला भाजपऐवजी बच्चू कडू यांच्या विरोधात बोला अशी सूचना केल्याचे एका पत्रकार परिषदेत सांगितले होते. तेव्हा काँग्रेस, भाजप पदाधिकारी व मतदारसंघातील जनतेचा बबलू देशमुखांकडे पाहण्याचा चष्मा बदलला. प्रविण तायडे यांना भाजपची उमेदवारी घोषीत झाल्यावर तर अनेकांचा यावर विश्वास बसला. प्रविण तायडे हे डमी उमेदवार असल्याचे अनेकांचे म्हणणे होते. भाजपचा एक गट सुध्दा ही ओरड करित होता, त्या गटाने तसे बंड ही पुकारले. अचलपूर काँग्रेसला बडनेराचा बॅकअप भेटत असताना उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची जंगी सभा अचलपूरात झाली, आणि भाजपच्या बाजूने वातावरण निर्मीती झाली. आता भाजपचाच उमेदवार लढतीत दुसऱ्या क्रमांकावर आल्याने काँग्रेसच्या बुडत्याचे पाय खोलात दिसायला लागले. त्यामूळे प्रचारात मिळत असलेला बॅकअप थांबल्याची माहिती आहे. आता बबलू देशमुख हे अधांतरी झाले आहे. हेच कारण अचलपूर मतदारसंघात प्रहार आणि भाजप अशी खरी लढत दिसत आहे.

---


## सार्वजनिक सूचना

माझ्या पक्षकाराने दिलेल्या माहिती आणि अधिकार आणि कागदपत्रांच्या आधारे, मी सर्व लोकांसाठी ही सार्वजनिक नोटीस जारी केली आहे. की दिनांक 30/04/2012 च्या खरेदी खताची मूळ प्रत (1) श्रिमती प्रमिला अशोकराव जावलकर, (2) कु. शितल अशोकराव जावलकर तर्फे मुखत्यार श्रिमती प्रमिला अशोकराव जावलकर, (3) कु. चंचल अशोकराव जावलकर, (4) श्रि. राम अशोकराव जावलकर विक्रेता म्हणून आणि वसंत शंकरराव देशमुख रा. शिवाजी नगर चांदुर रेल्वे खरेदीदार म्हणून दरम्यान अंमलात आणली गेली आहे. हे खरेदीखत चांदुर रेल्वे च्या सब रजिस्ट्रारकडे रीतसर नोंदणीकृत असलेले अनुक्रमे नोंदणी क्रमांक 898 दिनांक 30/04/2012 असुन सदर खरेदी खताची मुळ प्रती हरवली आहे. ह्या नोटिस द्वारे सर्वत्र लोकांस कळविणेत येते की ज्या कुणाचा ह्या खरेदी संबंधात कोणताही हितसंबंध किंवा हक्क वा उजर किवा ताबा असेल तसेच कर्ज असेल किंवा अधीकार असेल त्याकरीता नोटिस प्रकाशीत झालेपासुन 07 (सात) दिवसाचे आत खालील पत्यावर माहीती वा संबंधीत कागदपत्रांचा पुरावा सादर करावा. ह्यानंतर कोणताही आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वाक्षरी**
**ॲड. प्रविण भुस्कडे**
**सांगेकर नगर भक्तिधाम रोड**
**चांदूरबाजार जिल्हा अमरावती.**
**मो. क्रमांक 8788355988**